MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

Jan. To March 2021
Issue 37, Vol-03

Date of Publication
01 Jan. 2021

Editor
Dr. Bapu g. Gholap
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली
नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले

-महात्मा ज्योतीराव फुले

❖ **विद्यावार्ता** या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. **न्यायक्षेत्र:बीड**

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat**.

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Lale ... Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

13) ग्रामोद्धाराचे मूलगामी चिंतन : 'गावमातीचे अभंग'
डॉ. कमलाकर चव्हाण, जि. हिंगोली ||62

14) नाथ संप्रदाय:स्वरूप व चिकित्सा
प्रा.डॉ.राजेंद्र सुकदेव चौधरी, जि.नांदेड ||66

15) गांधीवाद आणि मराठी साहित्य प्रवाह
शशिक ांत शामराव चव्हाण, जि. क ोल्हापूर ||69

16) 'युगांत' : एक आकलन
प्रा.डॉ.बी.आर.दहिफळे, जि.लातूर ||72

17) भारतातील बेरोजगारीची समस्या
प्रा. डॉ. पांडुरंग सदाशिव डांगे, जिल्हा गोंदिया ||76

18) भारतीय पर्यटन उद्योग विकास
प्रा.सतिश आर.जाधव, मोवाड ||80

19) बिदर जिल्ह्यातील ऐतिहासिक किल्ले : ऐतिहासिक पर्यटन केंद्राचा भौगोलिक अभ्यास
कनाडे पल्लवी कंटेप्पा, उदगीर ||83

20) मॉब लिंचिंग एक सामाजिक समस्या
प्रा. डॉ. प्रविण कनकुटे, जालना ||86

21) संत कवयित्रींची अंधश्रद्धा निर्मूलन भक्ती
डॉ.अनिल मुंढे, जि. लातूर ||88

22) देवदासी विरोधी चळवळीचे महिला सुधारणेतील योगदान
प्रा.डॉ.सतीश गंगाराम ससाणे, अहमदपूर ||90

23) ज्ञानेश्वरी : परंपरेची-ज्ञानेश्वरांची आणि ज्ञानेश्वरीतील
प्रा.डॉ.वसंत रघुनाथ शेंडगे, जि.अहमदनगर ||92

24) असंघटित कामगार अर्थव्यवस्थेतील दुर्लक्षीत घटक
प्रा.डॉ.बी.आर शिंदे, जि.परभणी ||97

25) सहकार चळवळ व राजकारण — एक संबंध
प्रा. डॉ. संभाजी तनपुरे, जि. अहमदनगर ||100

www.vidyawarta.com/03 — http://www.printingarea.blogspot.com

24

# असंघटित कामगार अर्थव्यवस्थेतील दुर्लक्षीत घटक

प्रा.डॉ.बी.आर शिंदे
वाणिज्य विभाग,
कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय सोनपेठ, जि.परभणी

**********

भारतात असंघटित कामगारांची संख्या संघटित कामगारपेक्षा जास्त आहे. जे कामगार नोंदणीकृत कारखाने खाणी, उद्योग, शासकिय व निम शासकीय संस्था बंदर, विमा कंपण्या,बँका इ. या क्षेत्रातील कामगारांची संख्या वगळता जे कामगार आहेत त्याना संघटित कामगार असे म्हणतात.भारतात असंघटित कामगार २०१२ च्या गणने नुसार ४८ कोटी ७० लाख ऐवढी होती. आज भारतात असंघटित कामगाराची संख्या त्याची पेक्षा जास्त आहे. त्यांना आपल्या हक्क आणि कर्तव्याची किंवा त्यांच्या विषयी असलेल्या कल्यानकारी योजना याविषयी जानीव नाही. त्यामुळे हे सर्व कामगार संघटित होउ शकले नाहीत त्याचा परिणाम गेल्या अनेक वर्षा पासुन या कामगारा वरती अन्याय होत गेलेला आहे. त्यांना कधीही न्याय मिळाला नाही. कारण हे सर्व कामगार अस्थिर आहेत. या कामगाराना मिळणारा रोजगार तात्पुरता आहे. त्यांचा परिणाम हे कामगार एका मालकाकडे आणि एका ठिकाणी कामासाठी टिकूण राहात नाहीत. म्हणजेच एका ठिकानचे काम संपल्यानंतर दुसऱ्या ठिकाणी दुसऱ्या मालकाकडे कामासाठी जातात आणि त्या ठिकानचे काम पुर्ण झाल्यानंतर व पुन्हा काम मिळाले नाहीतर ते परत आपल्या गावी जातात. याचाच अर्थ असंघटित कामगारांना आजही देशाला स्वतंत्र्य मिळवून ७० वर्षे पुर्ण होवून सुध्दा कामासाठी भटकत फिरावे लागते. त्यांना आजही भारत सरकारणी १९४८ च्या कायद्यानुसार तरतुदी तयार केलेल्या असताना सुध्दा त्याचे फायदे त्यांना योग्य पध्दतीने मिळत नाहीत. त्यामुळे हे कामगार स्थिर होवू शकले नाहीत ते अस्थिर राहीले. म्हणजेच आजही असंघटित कामगार पुर्ण देशामध्ये विखुरलेले आहेत. त्यामुळे ते आजपर्यंत संघटित होवू शकले नाहीत. म्हणून असंघटित कामगार भारत सरकारच्या सोयी आणि सुविधेपासून दुर्लक्षीत राहिला. त्याच्या समोर संघटित होण्यासाठी बऱ्याच अडचणी निर्माण झाल्या. त्या अडचणी सोडवीण्यासाठी त्यांच्यात पुढाकार घेण्याची शक्ती जास्त नसते. त्यांच्या पैक्षा मालकीची सौदा शक्ती जास्त असते. त्यामुळे भारत सरकारणे संघटीत कामगारांसाठी कायदे केलेले असले तरी असंघटित कामगार संघटित नसल्यामुळे त्यांच्या साठी तयार केलेल्या नियम व अटीचे मालक वर्गाकडून साठी तयार केलेल्या नियम व अटीचे मालक वर्गाकडून योग्य पध्दतीने पालन होत नाही त्यामुळे त्यांच्यावर अन्याय होतो. त्यांना मिळेल ते काम मिळेल त्या मोबदल्यावर करावे लागते. कारण त्यांच्या समोर कोणत्याही पर्याय नसतो. त्यामुळे असंघटित कामगांराच्या बाबतीत अनेक समस्या निर्माण होतात त्या समस्या सोडविण्यासाठी सरकार किंव्हा मालक वर्ग जानीव पुर्वक दूर्लक्षीत करतात या दुर्लक्षीत केलेल्या समसेचा अभ्यास या लेखात आपणास करावयाचा आहे.

## ०१. कामाचा अनिश्चित मोबदला.

असंघटित कामगाराना त्यांनी केलेल्या कामाचा मोबदला अनिश्चित स्वरूपाचा दिला जातो. परंतु औद्योगीक करणानंतर मोठया प्रमाणावर उत्पादन वाढत गेले.त्याबरोबर कामगारांची संख्या वाढत गेली परंतु त्यांच्यात संघटित पणा निर्माण झाला नाही. त्यांच्या परिणाम असंघटित कामगारानी केलेल्या कामाच्या मोबदल्यावर झाला. औद्योगीकरणामुळे उत्पादकांचे उत्पादन वाढले त्यांच्या नफयात वाढ झाली. परंतु कामगारांना कमीत कमी मोबदला देवून त्यांच्या कडून काम करून घेतले जाते. २० व्या शतकात वेगवेगळया कामगांराच्या संघटना निर्माण झाला.परंतु हा कायद्या ज्या व्यावसाय उद्योगावी नियमाचे पालन केले आहे भारत सरकारणी घालून दिलेल्या अटी पुर्ण केलेल्या आहेत. अशाच उद्योगामध्ये काम करणाऱ्या कामगारांना याा कायद्यामुळे किमान मोबदला मिळण्याचे कायदे



Late Ramesh Warpudkar College Sonpeth Pin-431516

मिळतो परंतु या कायद्याच्या कक्षेत जे उद्योग येत नाहीत अशा कामगारांना त्यांनी केलेल्या कामाचा योग्य मोबदला मिळणार नाही त्यामुळे त्यांना आवश्यक गरजा पूर्ण करणे अशक्य होत नाहीत. कारण असंघटित कामगारांना कामाचा दर वर्षी किंवा कंत्राट दाराच्या सोयीने व मर्जीने ठरवले जातात. ज्या उद्योगात १९४८ चा किमान वेतन कायदा लागु करण्यात आला आहे त्या उद्योगात सुध्दा त्या कायद्याच्या अंमलबजावणी योग्य पध्दतीने केली जात नाही. अंमलबजावणी म्हणजेच कायद्याने ठरवून दिलेल्या मोबदल्या पेक्षा कमी मोबदला दिला जातो. कामगारांच्या कल्याणासाठी वेळोवेळी कामगारांच्या मोबदल्याच्या दरात करावी लागणारी सुधारणा ती वेळेवर केली जात नाहीत. त्यामुळे कामगारांना आर्थिक फायदे मिळत नाहीत. आर्थिक फायदे होत नसताना सुध्दा असंघटित कामगार असल्यामुळे हा प्रकार उघडकीस आनला जात नाही. त्याचा परिणाम या कामगाराचे मोठया प्रमाणात आर्थिक शोषण होते.

**०२ वाजवी पेक्षा जास्तीचे कामाचे तास**

असंघटित कामगारांना भारत सरकारनी कामगार कायद्यानुसार कामाच्या, सुट्टीच्या वेळा ठरवून दिलेली असताना सुध्द त्यांना जास्तीचे काम करावे लागले. कारण ते संघटित नाहीत त्यांना कामाच्या तासाचे बंधन नाही. किती वेळ काम करावे याचे बंधन नाही कारण ते असंघटित त्यामुळे त्यांना जास्तीचे काम करावे लागते. त्याचा परिणाम त्यांच्या कामाच्या कार्यक्षमतेवर होतो. त्यांच्या कामाचा वेग कमी होतो. म्हणून भारत सरकारने कामगारासाठी कारखाना अधिनियम १९४८ नुसार कायदा करण्यात आला या कायद्यात कामगारानी आठवड्याचे ४८ तास काम केले पाहिजे प्रौढ कामगारानी जमीनीवर तास व जमीनीखाली ८तास काम केले पाहिजे त्यात ५तास नंतर अर्ध्या तासाची विश्रांतीसाठी सुट्टी दिली जाते. ठरवून दिलेल्या कामापेक्षा जास्त काम केले तर त्याच्या कामाच्या मोबदल्याच्या डबल मोबदला त्याला मिळाला पाहीजे. अशा प्रकारच्या तरतुदी संघटित कामगारांच्या बाबतीत करण्यात आल्या परंतु असंघटित कामगार या कायद्या पासुन दुर्लक्षीत राहिले यांच्या कामाचे तास मालक वर्गाच्या सोयीनुसार ठरविले जातात. त्यानुसार दिली जात नाही. जास्तीचे काम केल्यामुळे त्यांना त्या कामाचा मोबदला दिला जात नाही. म्हणून असंघटित कामगार भारत सरकारणी निर्माण करुन दिलेल्या कायद्या पासुन दुर्लक्षीत राहीला म्हणून त्यांच्या समोर अनेक समस्या निर्माण झाल्या.

**०३ असंघटित कामगाराची सोदाशक्ती कमी.**

असंघटित कामगारांची सोदाशक्ती कमी असते. कारण असंघटित कामगारात बेकारी, व अर्ध बेकारीचे प्रमाण जास्त असते त्यामुळे या असंघटित प्रमाण जास्त असते त्यामुळे या असंघटित बेकार व अर्ध बेकारांना मिळते काम मिळेल त्या मोबदल्यात करावे लागते त्यामुळे हे कामगार आर्थिक दृष्टया मागास राहीले त्याच्या आवश्यक गरजा त्याच्या उत्पन्नातून पुर्ण होत नाहीत त्यामुळे ते संघटित होउ शकले नाहीत त्याच्या परिणम भारत सरकारणी १९४८ च्या कायद्याखाली कामगारासाठी अनेक नियम व अटी घालून दिल्या परंतू त्याचा फायदा असंघटित कामगारांना झाला नाही. म्हणून ते संघटित झाले नाही. आर्थिक दृष्टया मागास राहीले. त्यांचा परिणाम प्रबल सौदा शक्ती असणाऱ्या मालक वर्गा पेक्षा त्याची सोदाशक्ती कमी पडली म्हणून आजही वेगवेगळया असंघटित कामगार वर्ग दुरलक्षीत राहीला.

**०४ असंघटित कामगाराच्या रजा व पगारी सुटया.**

भारतात स्त्री, पुरूष असंघटित कामगाराची संख्या मोठी असुन ती पुर्ण देशात विखुरलेली आहेत. त्यामुळे ते संघटित हेतु शकले नाहीत या कामगाराना संघटित कामगाराना असलेल्या १८४८ च्या कायद्यानुसार लागु करण्यात आलेल्या तरतुदी लागु करण्यात आल्या नाहीत त्यामुळे या कामगारांना त्यांच्या हक्काची रजा किंवा त्यांना मिळणाऱ्या पगारी सुटया मिळत नाहीत त्यामुळे त्यांची गैर सोय बरीच होते. कारण श्रम करणारा कामगार हा शेवटी माणुस आहे. जर ही व्यक्ती यंत्रा सारखी सतत काम करत राहीली तर त्यांना थकवा येतो.त्यांच्या आरोग्यास धोका पोहचू शकतो. त्यामुळे या कामगारांना हक्कांच्या रजा व पगारी सुटटी मिळाल्या पाहिजे. हक्काच्या रजा आणि पगारी सुटटी मिळाल्यामुळे तो दुसऱ्या दिवशी जोमाने व नव्या उत्साहाने कामाला लागेल.त्याचे आरोग्य चांगले राहील तो चांगल्या

पध्दतीने व मनलावून काम करेल.त्यामुळे त्यांच्या कामाच दर्जा वाढेल त्याचा परिणाम तो जो काम करतो. त्यात कुशाल बनेल. त्यातूनच त्या व्यावसायाचा नावलोकीक वाढेल. स्त्री कामगाराना सुध्दा हक्काच्या रजा आणि पगारी सुट्टया मिळाल्या तर त्या रजेचा व सुट्टयांचा उपयोग घरगुती त्यांच्या असणाऱ्या जबाबदाऱ्या पुर्ण करण्यासाठी होईल.

स्त्री यांनसाठी वेळोवेळी भारत सरकारने त्यांच्या हक्कांच्या रजा आणि पगारी सुट्टी याबदल वेगवेगळया तरतुदी करण्यात आल्या आहेत. ऐवढेच नव्हेतर स्त्रीयांना प्रस्तूतीच्या काळात १२ आठवडे हक्काची रजा मिळते. परंतू असंघटित कामगार चा पासुन दुरलक्षीत राहीले त्यांना कोणत्याही सोयी सुविधा मिळत नाहीत. त्यामुळे त्यांच्या समोर अनेक समस्या निर्माण होतात. त्यातून त्याचे शोषन होते.

**०५ असंघटित कामगारांना सुरक्षिततेचा अभाव.**

असंघटित कामगार ज्या ठिकाणी काम करतो त्या ठिकाणी योग्य पध्दतीची त्यांना सुरक्षा दिली जात नाही. त्यामुळे त्या कामगाराल आहेत्या परिस्थितीत काम करावे लागते त्याचा परिणाम त्याच्या आरोग्यावर व कामाच्या कार्यक्षमतेवर होतो. त्याला सतत शारीरीक कष्टाचे काम करावे लागते. जर आरोग्य दायी वातावरण नसेल तर कामगारांच्या आरोग्याला धोका होवून त्याची काम करण्याची कार्यक्षमता कमी होते.त्याचा परिणाम त्याच्या कामाच्या दर्जावर शुध्दा होतो त्यासाठी मालक वर्गाणी कामगार ज्या ठिकाणी करतो त्या ठिकाणी पर्यावरण चांगले ठेवले पाहिजे कामगाराना कामाच्या ठिकाणी पर्यावरण चांगले ठेवले पाहिजे कामगाराना कामाच्या ठिकाणी स्वच्छता ग्रह, उपग्रहे, बसण्याचे चांगली व्यवस्था केली पाहिजे कामगाराना काम करताना चांगल्या दजा यंत्र सामग्री पुरवली पाहिजे. कामगाराना कामकरताना योग्यती सुरक्षा पुरवली पाहिजे. परंतू असे मालक वर्गा कडून होत नाही. योग्य ती कामगाराची काळजी घेतली जात नाही. त्याचा परिणाम अनेक वेळा कामगाराच्या जिवावर बेततो. कामगारांचे तर नुकसान होतेच परंतु मालक वर्गाचा शुध्द मोठया प्रमाणात सोय होतो परंतू त्याच्या कडून कामगाराच्या कामाच्या परिस्थितत सुधारणा करण्या बाबत जानुन बुजून दुर्लक्ष केले जाते. कायद्याचे संरक्षण आसताना शुध्दा त्याची योग्य पध्दतीने अमलबजावणी केली जात नाही. म्हणून असंघटित कामगार भारतीय अर्थव्यवस्थेत दुर्लक्षीत राहीला.

**निष्कर्ष:–**

असंघटित कामगारांची संख्या देशात सर्वात जास्त असून त्याचा भारताच्या आर्थिक विकासामध्ये सिहांच्या वाय आहे.कारण आज देशातील महत्वाच्या क्षेत्रात उदा.बांधकाम क्षेत्र, शेती क्षेत्र, भाजी पाला विकणारे, वडापाव विकणारे इ. असंघटित कामगारांची भुमिका महत्त्वाची आहे. त्यांच्या शिवाय ही कार्य करणे असंख्य आहे. त्यांनी केल्येल्या कामाचा मोबदला त्या योग्य मिळाला पाहिजे. परंतू आजही शक्य सततकाम शुध्दा त्यांनी केलेल्या कामाचा योग्य मोबदला त्याना मिळत नाही. त्यांच्या कामाच्या तासावर नियत्रंन नाही १९४८ ला कामगारा विषयी तरतुदी निर्माण केल्या परंतू त्याची योग्य ती अमंलबजावणी केली जात नाही. यासाठी भारत सरकारणे असंघटित कामगारासाठी वेगळया तरतुदी त्या तरतुदीची अमंलबजावणी केली पाहीजे. असंघटित कामगाराच्या आरोग्याची काळजी घेतली पाहीजे घटक देशाच्या दृष्टीने महत्ववाच्या असून तो दुर्लक्षीत आहे. त्यामुळे भारत सरकारने त्या घटकाची काळजी घेतली पाहीजे.

**संदर्भ –**

१. भारताचा आर्थिक विकास–यंशवतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशीक

२. शेत मजुराच्या व्यथा आणि उपाय – उत्तम कांबळे

३. भारतीय अर्थव्यवस्था– भालेराव कुलकर्णी

४. जगतीकरण आणि शेती – डॉ.मारोती कच्छवे.

PRINCIPAL
Late Ramesh W... (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani